पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९२७ दि. ०६/०९/२०१९**

## मार्केटयार्ड पोलीस स्टेशन, पुणे शहर

## परप्रांतातुन हरविलेल्या १६ वर्षाच्या मुलास नातेवाईकांच्या ताब्यात दिले बाबत.

---

मार्केटयार्ड पोलीस स्टेशन हद्दीत आज दि.५/०९/२०१९ रोजी ११/०० वा.चे सुमारास एका मुलास रिक्षावाला मार्केटयार्ड पोलीस स्टेशन जवळ सोडुन निघुन गेला.तो मुलगा इकडे तिकडे फिरत असताना त्याच्यावर संशय आल्याने त्यास पोलीस स्टेशन येथे घेवुन आलो असता त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे रवि राकेश गौर वय १६ वर्षे रा.भोपाळ असे सांगितले.त्यानंतर त्याला विश्वासात घेवुन चौकशी केली असता मी मित्राकडे जातो असे सांगुन घरातुन निघुन आलो होतो मी याठिकाणी कसा आलो याबाबत मला काही एक सांगता येत नाही.त्यानंतर त्याच्या जवळील मोबाईल फोनवरुन त्याचे वडील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की तो माझाच मुलगा असुन तो कोठे आहे.तो हरवले बाबत दि.०२/०९/२०१९ रोजी मी सरोद पोलीस ठाणे जि.भोपाळ येथे प्रथम मनुष्य मिसिंग रजि.नं.७६/१९ अन्वये तक्रार दिलेली होती.त्या नंतर तो १६ वर्षाचा असल्याने गुन्हा रजिस्टर नंबर ५६८/१९ भादवि कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर मुलाच्या कुटुंबियांशी फोनद्वारे ओळख पटल्याने व त्याचे वडील व नातेवाईक हे भोपाळ मध्यप्रदेश या ठिकाणाहुन मार्केटयार्ड पोलीस स्टेशन येथे आल्याने सदर मुलास त्यांच्या ताब्यात सुखरुप देण्यात आले.त्यावेळी त्या मुलाच्या नातेवाईकांनी पुणे पोलीसांचे आभार मानुन कौतुक केले.

